# NATIONAL INTEGRATED MEDICAL ASSOCIATION


*MAHARASHTRA STATE BRANCH*

*(All India Organisation of Graduates of Integrated Medicine )*

*Regd. Under Societies Registration Act of 1860, Reg. No. BOM/282/71GBBSD) RPT. No. F/2469 Mum.*

| | |
|---|---|
| PRESIDENT | - DR. MANOHAR M. JUMLE 43, Wanzari Nagar, NAGPUR- 440009. Mob. - 9373108405 / (0712) 2754373 |
| GEN.SECRETARY | - DR.SHAILESH S. NIKAM, 8, Sairaj Apt., Ashoka Marg, B/H Fame Cinema, Pune Road, NASHIK- 422011. Mob. - 9423972131 |
| TREASURER | - DR. RAJARAM H. JADHAV Main Road, A/P MADALMOHI, Tal Gevrai, Dist Beed - 431127. Mob. - 9604452159 / 9850244594 |


*जा.क्र. NIMA/MSB/GS/09/5245/2012-14* **Date - 11 September 2014**

प्रति,
मा. अध्यक्ष / सचिव / कोषाध्यक्ष,
एन. आय.एम.ए. ____________शाखा

विघ्नहर्त्याच्या आशिर्वादाने आपल्या जीवनातील सर्व विघ्ने दुर व्हावी ही प्रार्थना !

अत्यंत महत्वाचे -

महाराष्ट्रातील आयुर्वेद व युनानी पदवी व पदव्युत्तरधारकांनाAllopathy चिकित्सा प्रणाली वापरण्याचा अधिकार शासकिय परिपत्रक १९९२ व १९९९ नुसार प्राप्त झाला होता त्याचे दि. २६ जुन २०१४ रोजी शासकिय परिपत्रकाद्वारे मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांच्या स्वाक्षरीनंतर MMP Act 1961 मधील कलम २५ मध्ये मुद्दा क्र. ४ व ५ चा समावेश करून कायद्यात रूपांतर महाराष्ट्र शासनाने केले. यासाठी एन.आय.एम.ए. संघटनेने २५ वर्षापासुन पाठपुरावा करून विशेष परिश्रम घेतले.

परंतु दि. ०८ ऑगस्ट २०१४ रोजी IMA पुणे शाखेने महाराष्ट्र शासन, CCIM, MCIM यांच्याविरोधात मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल केलेली आहे. या याचिकेत १९९२, १९९९ चे परिपत्रक व सुधारित कायदा रद्द करण्याची मागणी IMA तर्फे करण्यात आलेली आहे. सदर याचिका न्यायालयात ग्राह्य मानून सदर निर्णयांना stay मिळाल्यास सर्व आयुर्वेद व युनानी पदवीधारकांचा Allopathy वापरण्याचा अधिकार मा. न्यायालयाचा निर्णय येईपर्यन्त स्थगित होऊ शकतो.

दि. २५ ऑगस्ट २०१४ रोजी ही याचिका न्यायालयात रजिस्टर झालेली आहे. न्यायालयाने पुढील सुनावणीसाठी ०८ ऑक्टोबर २०१४ ही तारीख दिली होती. परंतु IMA ने अत्यंत अत्यावश्यक यासदराखाली emergency bench समोर ते मांडले व त्यासाठी तातडीने म्हणुन ०१ सप्टेंबर २०१४ रोजीच प्रथम सुनावणी घेण्यात आलेली आहे.

या सर्व बाबींवर NIMA महाराष्ट्र राज्य शाखेने बारकाईने लक्ष ठेवलेले असुन सदर प्रकरणात आयुर्वेद व युनानी पदवीधारकांची भुमिका न्यायालयासमोर मांडण्यासाठी न्यायालयात याविषयात NIMA महाराष्ट्र राज्य शाखा Interven झालेली आहे. सदर प्रसंगी न्यायालयात NIMA राज्य शाखेचे अध्यक्ष डॉ. मनोहर जुमळे, सचिव डॉ. शैलेश निकम, डॉ. विनायक टेंभूर्णीकर, डॉ. विनायक म्हात्रे, डॉ. कैलास गौड, डॉ. के.टी. पाटील, डॉ. राजेन्द्र खटावकर. डॉ. मंदार रानडे, डॉ. मिलिंद कुलकर्णी, डॉ. मुश्ताक मुकादम, डॉ. गणपत्ये, डॉ. अरगडे, डॉ. अभिनंदन पाटील, डॉ. आंग्रे हजर होते.

निमा संघटनेच्या वतीने मुबई उच्च न्यायालयातील अड. श्रीकांत गावंड, ज्येष्ठ विधितज्ञ अड. कुंभकोणी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

सदर न्यायालयीन प्रक्रियेमध्ये सर्व कायदेशीर व इतर अत्यावश्यक बाबी पहाण्यासाठी एन.आय.एम.ए. राज्य शाखेने अध्यक्षांच्या आदेशान्वये डॉ. मनोहर जुमळे, डॉ. शैलेश निकम, डॉ. विनायक म्हात्रे, डॉ. मंदार रानडे, डॉ. के.टी. पाटील, डॉ. नितीन कोथळे व डॉ. मिलिंद कुलकर्णी यासदस्यांची एक समिती गठित केलेली आहे.

या सर्व न्यायालयीन कामकाजासाठी मोठा आर्थिक निधी आवश्यक असुन आपल्या पदवीधारकांचा हक्क अबाधित ठेवण्यासाठी तीव्र लढा सर्वांनी सोबत येऊन देणे अत्यावश्यक आहे.

सर्व एन.आय.एम.ए. स्थानिक शाखांनी खालील बाबींवर अंमल करावा.

१. आपल्या शाखेतील सर्व सदस्यांना आमंत्रित करून मिटिंग आयोजित करावी व सदर प्रकरणाची माहिती व गांभीर्य सर्व सदस्यांना अधोरेखित करून सांगावे.तसेच पुढील काळात राज्यशाखेकडुन प्राप्त होणा-या निर्देशानुसार करावयाच्या कार्याचे नियोजन करावे.

२. कोणत्याही बातमीची खातरजमा केल्याशिवाय त्यावर विश्वास ठेऊ नये. बातमीची विश्वासार्हता एन.आय.एम.ए. स्थानिक शाखा पदाधिकारी, राज्य शाखा पदाधिकारी, केन्द्रिय पदाधिकारी यांच्याशी संपर्क साधुन किंवा राज्य शाखा सचिव - डॉ. शैलेश निकम यांच्याशी ९४२३९७२१३१ या दुरध्वनीवर प्रत्यक्ष बोलून तपासुन घ्यावी. हाच संदेश आपल्या शाखेच्या सर्व सदस्यांनाही पोहचवावा.

३. या लढ्यासाठी प्रचंड आर्थिक सहाय्याची आवश्यकता असल्याने खालील प्रमाणे आर्थिक सहाय्य निमा राज्य शाखेकडे पाठविल्यास तीव्र लढा उभारण्यासाठी संघटनेला आर्थिक पाठबळ लाभेल. आपल्या शाखेच्या सदस्य संख्येनुसार प्रतिसदस्य किमान रू. १०००/- याप्रमाणे व खालील प्रमाणे आर्थिक निधी स्थानिक शाखा अध्यक्ष,सचिव, कोषाध्यक्षांनी जमा करून राज्य शाखेकडे पाठविणे अपेक्षित आहे.

| | | |
|---|---|---|
| ज्या सदस्यांची ५ बेडपर्यन्तची हॉस्पिटल्स आहेत त्यानी | - | रू. २००० |
| ज्या सदस्यांची ६ ते १० बेडेड हॉस्पिटल्स आहेत त्यांनी | - | रू. ३००० |
| ज्या सदस्यांची ११ ते ३० बेडेड हॉस्पिटल्स आहेत त्यांनी | - | रू. ५००० |
| ज्या सदस्यांची ३१ व त्यापुढील बेडेड हॉस्पिटल्स आहेत त्यांनी | - | रू. ७००० वा त्यापुढे ऐच्छिक |

सदर आर्थिक सहाय्य निधी एन.आय.एम.ए राज्य शाखेच्या मादळमोही, जिल्हा बीड येथील **"Natioanl Integrated Medical Association" Saving A/c - 62271161536, Bank - State Bank Of Hyderabad, Branch Madalmohi, Branch Code - 20439, IFS Code - SBHY0020439** याच खात्यात जमा करावा. अन्य कुठल्याही खात्यात सदर निधी जमा करू नये. स्थानिक एन.आय.एम.ए. शाखेच्या अध्यक्ष, सचिव व कोषाध्यक्षांनी संयुक्त जबाबदारीने सदर निधी वरील खात्यात जमा केल्यानंतर राज्य शाखेचे खजिनदार डॉ. राजाराम जाधव, मेन रोड, मादळमोही, ता. गेवराई, जिल्हा बीड - ४३११२७ , दुरध्वनी क्र. ९८५०२४४५९४ / ९६०४४५२१५९ यांच्याशी संपर्क साधुन माहीती व आर्थिक सहाय्य निधी जमा करणा-या सदस्यांची नावे व दिलेली रक्कम याची यादी पाठवावी.रक्कम अदा कराणा-या प्रत्येक सदस्यास सदर यादीनुसार एन.आय.एम.ए. महाराष्ट्र राज्य शाखेकडुन सदर रकमेची रितसर पावती दिली जाईल.

४. आपल्या भागातील IMA च्या स्थानिक पदाधिकारींची भेट घेऊन चर्चा करावी व पत्रक देऊन IMA पुणे शाखेविषयक आपला निषेध नोंदवावा.

५. IMA आयेजित सर्व सेमिनार्स, सी.एम.ई आदी कार्यक्रमांवर बहिष्कार घालावा.

६. आपल्या स्वतःच्या रूग्णालयात IMA सदस्य डॉक्टर्सना रूग्णतपासणीसाठी कॉल देऊ नये.

७. IMA सदस्य डॉक्टरांकडे रूग्ण संदर्भित (रेफर) करण्याऐवजी NON IMA Members किंवा शासकिय रूग्णालयात संदर्भित (रेफर) करावेत.

कळावे. धन्यवाद.
जय एन.आय.एम.ए. !

आपला



डॉ. शैलेशकुमार एस. निकम
सचिव - एन.आय.एम.ए. महाराष्ट्र राज्य शाखा